राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नागरी स्तरावर समिती गठीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र. एनसीए २०१८/प्र.क्र.१९६(२)/ता.क.२,
१५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९

वाचा-

१. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ आजपर्यंत दुरुस्ती केल्याप्रमाणे
२. हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ आजपर्यंत दुरुस्ती केल्याप्रमाणे
३. मा.राष्ट्रीय हरीत लवाद, मुख्य खंडपीठ, नवी दिल्ली यांनी अर्ज क्र.६८१/२०१८ मध्ये पारित केलेले दिनांक ८/१०/२०१८ रोजीचे आदेश
४. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दिनांक २४/०४/२०१९ रोजीचे पत्र

प्रस्तावना-

मा.राष्ट्रीय हरीत लवाद, मुख्य खंडपीठ, नवी दिल्ली यांनी अर्ज क्र.६८१/२०१८ मध्ये दिनांक ०८/१०/२०१८ अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश with non-attainment cities यांनी, हवेच्या गुणवत्तेची मानके विहित मर्यादेत आणण्यासाठी, कारवाई करावयाच्या अंतीम तारखेपासून सहा महिन्यांच्या आत योग्य ती कृती आराखडा दोन महिन्यांच्या आत तयार करावा. मा.राष्ट्रीय हरीत लवादाने पुढे असेही आदेश दिले आहेत की, सहा सदस्यीय समितीने सदर कृती आराखडा तयार करावा, ज्यामध्ये पर्यावरण, वाहतूक, औद्योगिक, नगर विकास , शेती या विभागांचे संचालक आणि सदस्य सचिव, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा संबंधीत राज्यांच्या समित्या यांचा सहभाग असावा. तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २४/०४/२०१९ रोजीच्या पत्रानुसार राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समिती स्थापन करण्याबाबत आदेश दिले आहेत.

शासन निर्णय :-

मा.राष्ट्रीय हरीत लवादाचे दिनांक ०८/१०/२०१८ रोजीचे आदेश व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक २४/०४/२०१९ रोजीच्या पत्रास अनुसरुन, खालीलप्रमाणे नागरी स्तरावर समिती गठीत करण्यात येत आहे.

अनुक्रमांक	समितीचे सदस्य	पद
१.	जिल्हाधिकारी / महापालिका आयुक्त	अध्यक्ष
२.	पोलिस आयुक्तांचे प्रतिनीधी	सदस्य
३.	प्रतिनिधी- जिल्हाधिकारी / महापालिका आयुक्त /नगरपालिका	सदस्य
४.	शैक्षणिक संस्था अथवा संशोधन संस्थेतील तज्ञ	सदस्य
५.	जिल्हा आरोग्य अधिकारी	सदस्य
६.	प्रादेशिक वाहतुक अधिकारी	सदस्य
७.	कारखान्यांच्या संस्थेचे प्रतिनिधी	सदस्य
८.	प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ	सदस्य सचिव

जिल्हाधिकारी/महापालिका आयुक्त यांनी यांच्या कार्यक्षेत्रातील नामवंत शैक्षणिक संस्था व संशोधन संस्था यांच्या प्रतिनिधींची तज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती करावी.

सदर समितीच कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

१. IIT (B)/NEERI यांच्या तज्ज्ञ समितीने सादर केलेल्या मसुदा हस्तक्षेप आणि नागरी कृती योजनांचे पुनरावलोकन करणे आणि त्यांना राज्यस्तरीय हवा गुणवत्ता तपासणी समितीकडे पाठवणे.
२. कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमा अंतर्गत घटक / उपक्रमांच्या प्रगतीची देखरेख करणे.
३. राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमा अंतर्गत सर्व हस्तक्षेप कार्यक्रम दस्तावेज / परिचालन मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने आणि शहर / घटकानुसार अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सी / भागीदारांना अपेक्षित परिणाम साधण्यासाठी योग्यरित्या कार्यरत आहेत , याची देखरेख करणे.
४. त्यांना संदर्भित केलेल्या इतर कोणत्याही बाबींचे पुनरावलोकन करणे आणि आवश्यकतेनुसार या विषयांवरील शिफारसी करणे.
५. राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमा अंतर्गत शहरातील विशिष्ट घटक / उपक्रमांसह संघटनांमधील सहकार्यास उत्तेजन देणे.
६. उपरोक्त कारवाईच्या प्रगतीचे पुनरावलोकन करण्यासाठी नागरी स्तरावरील समिती दरमहा बैठक आयोजित करेल.
७. निरिक्षण समिती आवश्यक असेल तेव्हा दुसऱ्या कुठल्याही व्यक्तिीची निवड करेल.
८. नागरी स्तरावरील समिती दररोजच्या देखरेखीसाठी आणि अंमलबजावणीसाठी जबाबदार राहील.
९. नागरी स्तरावरील समिती मासिक प्रगती अहवाल राज्य पातळीवरील वायु गुणवत्ता नियंत्रण समितीस (एक्यूएमसी) सादर करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९१८१७४०३३६१०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Shuddhodhan D Aher

Digitally signed by Shuddhodhan D Aher
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=19193e305825f30c0c7381430cc0f9fc9d9e4c47c2406ef9eca6ab6b77af1844, serialNumber=d9ed3af978d744c807b97e5551edcd2ab6f11c5495f5d6ef4863887d2775315c, cn=Shuddhodhan D Aher
Date: 2019.09.18 18:04:06 +05'30'

(शु. द. आहेर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२) मा. मंत्री (पर्यावरण) यांचे स्वीय सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३) मा. राज्य मंत्री (पर्यावरण) यांचे स्वीय सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२
५) अपर मुख्य सचिव, उद्योग विभाग , महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई
६) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई
७) प्रधान सचिव, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
८) सचिव, गृह विभाग (परीवहन) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
९) संचालक, (पर्यावरण), मुंबई
१०) संदस्य सचिव,महाराष्ट प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
११) सर्व जिल्हाधिकारी
१२) पोलीस आयुक्तांचे प्रतिनीधी

१३) सर्व महापालिका आयुक्त
१४) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका
१५) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी
१६) सर्व प्रादेशिक वाहतूक अधिकारी,
१७) सर्व प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ.

Constitution of City Level Committee for effective implementation of National Clean Air Program (NCAP).

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Environment Department
Government Resolution No. NCA 2018/CR.196(2)/T.C.2

15th Floor, New Administrative Building, Hutatma Rajguru Marg,
Madam Cama Marg, Mantralaya, Mumbai-400 032.
Dated 18th September, 2019

Read :-

1. Environment (Protection) Act, 1986 (Amendment from time to time).
2. Air (Prevention & Control of Pollution) Act, 1981 (Amendment from time to time)
3. Order dated 08/10/2018 passed by the Hon'ble National Green Tribunal, Principal Bench New Delhi in Application No.681/2018
4. Letter dated 24/04/2019 received from the Central Pollution Control Board.

Preamble:

The Hon'ble National Green Tribunal, Principal Bench, New Delhi vide order dated 8/10/2018 passed in Application No.681/2018 directed that all the States and Union Territories with non-attainment cities must prepare appropriate Action Plans within two months aimed at bringing the standards of air quality within the prescribed norms within six months from the date of finalization of the actions. The Hon'ble NGT further directed that the Action Plans may be prepared by six member committee, comprising of Directors of Environment, Transport, Industries, Urban Development, Agriculture and Member Secretary, State Pollution Control Board or Committee of concerned State. The Central Pollution Control Board vide letter dated 24/04/2019 directed to constitute a Committee to ensure effective implementation of NCAP.

Government Resolution-

In compliance of the Hon'ble NGT Order dtd.8/10/2018 and CPCB's letter dated 24/04/2019, the following City Level Air Quality Monitoring Committee is hereby constituted.

Sr.No.	Committee Member	Designation
1.	District Collector/ Municipal Commissioner	Chairman
2.	Representative of Commissioner of Police	Member
3.	Representative of District Collector / Municipal Corporation / Council	Member
4.	Expert member from academics or research institutes	Member
5.	District Health Officer	Member
6.	Regional Transport Officer	Member
7.	Industry Association Representative	Member
8.	Regional Officer, Maharashtra Pollution Control Board	Member Secretary

District Collector/ Commissioner of Municipal Corporation shall appoint the Expert Member from esteemed academic and research institutes.

The Terms of Reference of the City Level Air Quality Monitoring Committee shall be as given below:

(i) To review the draft interventions and city action plans submitted by expert committee of IIT(B)/ NEERI and forward them to State level AQMC.

(ii) To monitor the progress of components/ activities under NCAP to ensure strict implementation of the programme.

(iii) To oversee that all interventions under NCAP are in line with the programme document / operational guidelines and that the city/ component wise implementing agencies/ partners are appropriately tasked to deliver the results expected.

(iv) To review any other matters referred to them and make recommendations on these matters as and when required.

(v) To stimulate collaboration between the organizations involved with city specific components/ activities under NCAP.

(vi) The City Level Committee shall plan monthly meeting for progress review of above said actions.

(vii) The Monitoring Committee may co-opt any other person as and when required.

(viii) The City Level Committee is responsible for day-to-day monitoring & implementation of the programme.

(ix) The City Level Committee shall submit the monthly progress report to the State Level Air Quality Monitoring Committee (AQMC).

This Government resolution of Maharashtra Government is available at the websitewww.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201909181740336104. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Shuddhodhan D Aher

Digitally signed by Shuddhodhan D Aher
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=19193e305825f30c0c7381430cc0f9fc9d9e4c47c2406ef9eca6ab6b77af1844, serialNumber=d9ed3af978d744c807b97e5551edcd2ab6f11c5495f5d6ef4863887d2775315c, cn=Shuddhodhan D Aher
Date: 2019.09.18 18:05:03 +05'30'

(Shuddhodhan D. Aher)
Deputy Secretary,
Environment Department

To Copy,

१) Principal Secretary for Hon.ble Chief Minister, Mantralaya Mumbai 32
२) Personal Secretary for Hon.ble Minister (Environment) Mantralaya Mumbai 32
३) Personal Secretary for Hon.nle State Minister (Environment) Mantralaya, Mumbai 32
४) Chief Secretry, Government of Maharashtra, Mantralaya Mumbai 32
5) Additional Chief Secretary, Industry Department, Mantralaya Mumbai
6) Principal Secretary, Urban Development Department, Mantralaya, Mumbai
7) Principal Secretary, Agricultural Department, Mantralaya, Mumbai
8) Secretary, Home (Transport) Department Mantralaya, Mumbai
9) Director, Environment Department, Mantralya, Mumbai
10) Member Secretary, Maharashtra Pollution Control Board, Mumbai
11) All District Collector.
12) Representative of Commissioner of Police
13) All Commissioner of Municipal Corporation
14) All Chief Officer, Municipal Council
15) All District Health Officer, Collector office
16) All Regional Transport Officer ,
17)All Regional Officer, Maharashtra Pollution Control Board.